**अर्जदाराची सरतपासणी विधिज्ञ श्री. राकेश अवघडे अर्जदारातर्फे :-**

११. आता मला माझे शपथपत्र **नि.क्रं. यु.९४** दाखविले. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. आता मला कागदपत्र यादी नि.यु.९८ सोबत अनु. १ ते ७ व ११ वर कामगार न्यायालयात दाखल केलेल्या विविध कागदपत्राच्या न्यायालयाने दिलेल्या विविध सत्यप्रती सादर केलेल्या आहेत सदर कागदपत्रास **नि.यु.९९ ते यु.१०६** देण्यात येते. कागदपत्र यादी नि.यु.९८ सोबत अनु. ८ वर मी माहीती मिळणे करीता सादर केलेला अर्जाची स्थळ प्रत मला दाखविली त्या**स नि.यु.१**०७ देण्यात येते. कागदपत्र यादी नि.यु.९८ सोबत अनु. ९ वरील जनमाहिती अधिकारी समाजकल्याण विभाग यांनी दिलेला आदेशाची मुळ प्रत सादर केलेली आहे सदर आदेशा**स नि.यु.१**०८ देण्यात येते. कागदपत्र यादी नि.यु.९८ सोबत अनु. १० वरील जिल्हा समाज कल्याण अधिकारी चंद्रपुर यांनी अध्यक्ष सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींचे वस्तीगृह चिमुर यांना दिलेल्या पत्राची प्रतीलिपी प्रत सादर केली आहे. सदर पत्रा**स नि.यु.१**०९ देण्यात येते. कागदपत्र यादी नि.यु.८९ सोबत सादर केलेली माझी नियुक्ती पत्राची छांयांकित प्रत मला दाखविली सदर नियुक्ती पत्रासंदर्भात सामनेवाल्याचे अधिवक्ता यांचा कोणताही वाद नसल्यामुळे त्या**स नि.यु.१**१० देण्यात येते.

**सरतपास पुर्ण**

**श्री.एस.एम.खंडारे गै.अ.यांचे विधिज्ञ यांचे तोंडी विनंतीवरून पुढील तारखेपर्यंत उलटतपास तहकुब करण्यात आला.**

समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

दि.१३/११/२०२५

स्वा/—

( अ.दा.तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय,चंद्रपुर-